# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/११/२०२३ (शुक्रवार)

---

## अॅल्युमिनीअम तार चोरी

**पोलीस स्टेशन मौदा :— अंतर्गत** मौजा सेलू ते परसाड शिवार ता. कामठी १५ किमी पश्चिम, यातील फिर्यादी कार्यालयात काम करीत असतांना, श्री. दिनकर देवराव ठाकरे यांनी फिर्यादीचे कार्यालयात येवून सांगितले कि, मौजा सेलू गावातील पलसाड रोड शिवारातील शेतक—यांना कृषी पंपसाठी जाणा—या विद्युत वाहिनीचे **अॅल्युमिनीयमचे तार व पोल पाडून कि. ५५,०००/रूपयाचे तार** दिनांक २२/११/२३ चे ११/०० वा ते २३/११/२३ चे १०/०० वा दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेषराव निलकंठ तितरमारे वय ३८ वर्ष कनिष्ठ अभियंता म. रा. वि.कं. मर्या. वडोदा मो नं. ७८७७७८९४८२ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा. द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा हरीश यंगलवार पो स्टे मौदा मो नं **९४२३२१९४२३** हे करीत आहे.